म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ५९२
सन १९२५

# पर्वती

(खंडकाव्य)

विठ्ठल कृष्ण नेरूरकर.

REFBK-0002858
REFBK-0002858

किंमत तीन आणे.

## शुद्धिपत्रक

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | १० | प्रवयामधिं | प्रवयामधिं |
| ४ | १७ | — | ' अतां ' हा शद्ब कुटुनि आणि अवलोकाल यांमध्यें वाचावा |
| ,, | २२ | बैसुवि | बैसुनि |
| ५ | २२ | ती | तो |
| ६ | ३ | ज्या | ज्यां |
| ,, | २१ | येत | येतां |
| ७ | १२ | मुसळाला | कुसळाला |
| १० | १७ | सार्थनामावति | सार्थनामवति |

## प्रमोद ऑफिसचीं पुस्तकें मिण्याचीं ठिकाणें

१ प्रमोद कार्यालय, ५७ मेढा मालवण, जि. रत्नागिरी
२ धि बॉबे बुकडेपो, गिरगांव मुंबई ४
३ एन्. जी. राजवाडे, बुधवारपेठ पुणें
४ श्री. मुजुमदार, शनैश्वर वाचनालय कोल्हापूर
५ बी. जी. कामत, धि सक्सेस शॉर्ट हंड अँड टाइपरायटर कंपनी
१४८४ काकतीवेस स्टीट बेळगांव
६ श्री. आजगांवकर बुकसेलर, सावंतवाडी
७ श्री. म. वि. बर्वे मुकादम, वरची आळी रत्नागिरी

# पर्वती.

( हृदयंगम खंडकाव्य )


लेखक व प्रकाशक,

विठ्ठल कृष्ण नेरूरकर, बी. ए.
संपादक ' प्रमोद. '


( शीलाचें मोल, दुधारी सुरी, सापत्न माता, तो क्षण, वगैरे कादंबऱ्या; राधाकृष्ण रहस्य, हिंदवासीयांचें आजचें प्रातःस्मरण, भारत-भारती गाईचा हंबरडा, सिंहगड-दर्शन, हिंदप्रबोधकाचें स्वर्गनिर्याण, सृष्टीचे कारागीर, श्री क्षेमराज्याधिरोहण, मेघप्रभाव, कवीची भेट, शिवरायाची द्वारका, इत्यादि काव्यें; सौभाग्य लाभ, कांचनगंगा इत्यादि नाटकें आत्मविकास व गॅ[illegible] तत्त्वज्ञान


REFBK-0002858

REFBK-0002858



कृष्णराव सीताराम देसाई.

श्री भगीरथ प्रेस, मालवण.

किंमत ३ आणे.



मराठी ग्रंथ संग्रहालय
काव्य ५५८

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. क्र. २८५८

## शुद्धिपत्रक

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | १० | प्रवयामधिं | प्रवयामधिं |
| ४ | १७ | — | ' अतां ' हा शब्द कुटुनि आणि अवलोकाल यांमध्यें वाचावा |
| ,, | २२ | बैसुवि | बैसुनि |
| ५ | २२ | ती | तो |
| ६ | ३ | ज्या | ज्यां |
| ,, | २१ | येत | येतां |
| ७ | १२ | मुसळाला | कुसळाला |
| १० | १७ | सार्थनामावति | सार्थनामवति |

### प्रमोद ऑफिसचीं पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें

१ प्रमोद कार्यालय, ५७ मेढा मालवण, जि. रत्नागिरी
२ धि बॉंबे बुकडेपो, गिरगांव मुंबई ४
३ एन्. जी. राजवाडे, बुधवारपेठ पुणें
४ श्री. मुजुमदार, शनैश्चर वाचनालय कोल्हापूर
५ बी. जी. कामत, धि सक्सेस शॉर्ट हंड अँड टाइपरायटर कंपनी
१४८४ काकतीवेस स्ट्रीट बेळगांव
६ श्री. आजगांवकर बुकसेलर, सावंतवाडी
७ श्री. म. वि. बर्वे मुकादम, वरची आळी रत्नागिरी

# पर्वती.

( हृदयंगम खंडकाव्य )

लेखक व प्रकाशक,

**विठ्ठल कृष्ण नेरूरकर, बी. ए.**
संपादक ' प्रमोद. '

( शीलाचें मोल, दुधारी सुरी, सापत्न माता, तो क्षण, वगैरे कादंबऱ्या; राधाकृष्ण रहस्य, हिंदवासीयांचें आजचें प्रातःस्मरण, भारत-भारती गाईचा हंबरडा, सिंहगड-दर्शन, हिंदप्रबोधकाचें स्वर्गनिर्याण, सृष्टीचे कारागीर, श्री क्षमराज्याधिरोहण, मेघप्रभाव, कवीची भेट, शिवरायाची द्वारका, इत्यादि काव्यें; सौभाग्य लाभ, कांचनगंगा इत्यादि नाटकें आत्मविकास व [illegible] तत्वज्ञान

REFBK-0002858
REFBK-0002858

कृष्णराव सीताराम देसाई.

श्री भगीरथ प्रेस, मालवण.

**किंमत ३ आणे.**

मराठी ग्रंथ संग्रहालय
काव्य ५५८
मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. क्र. २८५८

## प्रमोद ऑफिसांत मिळणारीं

# लोकप्रिय पुस्तकें

१ दुधारी सुरी–( मनोरंजक नवलकथा ) १ – ८
२ तो क्षण–( सद्विचार वर्धक नीतितत्वमय सामाजिक कादंबरी ) ० -- १२ -- ०
३ टॉलस्टायचें तत्वज्ञान–( तात्विक ग्रंथ ) ० – ५ – ०
४ सिंहगडदर्शन–[ काव्य ] ० – ३ – ०
५ श्री क्षेम--राज्याधिरोहण–[ काव्य ] ० – ५ – ०
६ हिंदवासियांचें प्रातःस्मरण –[ काव्य ] ०--१--०
७ चरक्यावरचें गाणें ० -- ० -- ६
८ सहधर्मचारिणी--[ स्वदेश प्रीतिवर्धक कादंबरी ] छापत आहे

## पुढें प्रसिद्ध होणारी पुस्तकें

९ कवीची भेट [ काव्य ]
१० कांचन पूरचा कृष्ण महाल--[ कादंबरी ]
११ गाईचा हंबरडा--[ काव्य ]
१२ शिवरायाची द्वारका--( काव्य )
१३ वेताळ हिल--( काव्य )

# निवेदन

" Mens evil manners we write iu brass
Their virtues we write in water ! "

माझें सिंहगडदर्शन काव्य" प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्रांतील सर्व नियत कालिकांनीं व प्रसिद्ध रसिकवर्यांनीं त्याचा फारच गौरव केला. आणि ज्या महाकाव्याचा तो पहिला भाग होता तें सर्व महाकाव्य लौकर पुढें यावें अशी कांहींनीं इच्छा दर्शविली. माझ्या कृतीबद्दल आत्मीयता वाटणाऱ्या कित्येक मित्रांचीं, तर नांव देखील ठाऊक नसणाऱ्या कित्येक अपरिचितांचीं मला गौरवपर पत्रेंही आलीं. परंतु कोणी केवळ उत्तेजन देण्याच्या बुद्धीनें असेल, कोणी भरपूर वेळ व स्थळ मिळण्यासारखें नसल्यामुळें असेल, कोणाच्या हातून नकळत गुणैकपातित्व घडलें असेल, पण दोषदिग्दर्शन असें कोणीच केलेलें नव्हतें. ह्मणून माझें काव्य निर्दोष होतें अशी माझी खरोखरीच कल्पनाही नव्हती आणि असल्या कल्पनेचा जर कांहीं अंश अंतःकरणाच्या कोपऱ्यांत कुठें दडून बसलेला असलाच तर त्याला धुडकावून लावण्याचें कार्य, काव्य प्रसिद्ध झाल्याबरोबर माझे मित्र प्रसिद्ध कादंबरीकार व रसिकमान्य श्री. ना. ह. आपटे व परमपूज्य साहित्याचार्य तात्यासाहेब कोल्हटकर यांनीं पाठविलेल्या प्रेमपूर्ण, विस्तृत, गुणदोष–विवेचन पूर्ण पत्रांनीं केलेंच होतें. असें असूनही एका संपादकांनीं आपल्या नियत कालिकांत माझ्या काव्यावर अभिप्राय लिहितांना पाडण

पृष्ठ सर्चा घालूनही गुणाचें मुळींच दिग्दर्शन न करतां सर्व काव्य येथून तेथून वाईट व दोषपूर्णच आहे असें ठसविण्याचा जो प्रयत्न केला, त्यावरून शिरोभागीं लिहिलेली उक्ती आठवली. त्यांनीं आपल्या अभिप्रायांत असल्या नीरस विषयांवर मीं काव्यें लिहूंच नये, असाही मला धोक्याचा इषारा देऊन ठेवला आहे आणि या त्यांच्या सूचनेबद्दल मला आभार मानल्याशिवाय काय करतां येणार आहे? तथापि जवढे अधिक दोष दिसतील तेवढे सुधारणेस अधिक हितकर होतात. म्हणून वरील माझ्या टीकाकारांचें मी अभिनंदन करून ते दोष नाहींसे करण्याचा मी यथाशक्ति प्रयत्न करीन असें त्यांस कळवितो.

महाकाव्याचा दुसरा भाग हें 'पर्वती' काव्य आज रसिकांच्या सेवेस सादर करतानां कळविण्यास आनंद वाटतो कीं, सिंहगडदर्शनकाव्य पुनर्मुद्रित करण्याचा सुयोग येण्याचें चिन्ह दिसत आहे. सिंहगडदर्शन प्रमाणेंच हें 'पर्वती' काव्यही रसिकानां प्रिय होवो अशी ईश्वराकडे प्रार्थना आहे. तथापि आपल्या इशाऱ्या विरुद्ध मी या काव्याच्या प्रकाशनाच्या भानगडींत पडल्यामुळें रागावून, वरील टीकाकारांनीं पूर्वींच्याहूनही जास्त दोषैकदर्शक टीका केली तरी तेंही माझ्या हिताचेंच होईल. "विस्तृत व निर्भीड अभिप्राय द्यावा" अशी नम्र विनंति माझी नेहमींचीच असते, याच्या पुढील भागही यथावकाश प्रसिद्ध करण्याचा मानस आहे. ईश्वरी इच्छा असेल तसें होईल.

रसिकांचा नम्र
वि. कृ. मेरूरकर.

दा. क्र. २८५

# पर्वती.

गङ्गाप्रवाहज-चलज्जसेक-रम्यम्
चन्द्रस्थिति-प्रगुणित-प्रभमुत्तमाङ्गम् ।
भस्मानुलेपनविधेर्धवलायमानम्
आपादमस्तकमहम्प्रणतोऽस्मि शम्भुम् ॥ १ ॥

(१)

दिवस सुखद जे गतायुमधले गोड तयांचें संस्मरण
कालावधिसह अधिक सुखावह होइ सहृदया आमरण
तात-अंबिका-सहवासांतिल बाल्य यौवनीं सुख देतें
हारवि यौवन-विलास—संस्मृति वार्धक्याच्या विपदेतें
प्रवयामधिं परतूनि पाहतां स्मृति-नेत्रांनीं माघारी
विद्यार्जन-काल-स्थिति दिसते शतगुण रम्य मनोहारी—
शिक्षणसाधन करितां होते प्रगल्भ मति वाद-नयांनीं,
लेखन, वाचन, गान, सुखाशन-पान-शयन, वादन, यांनीं—
जें सुख लाभे अनुभवितां नच दारुण चिंतेचे चटके
आतां कुठलें? आतां केवळ घेणें स्मृति-वर्णन घुटके!

(२)

अस्तमनीं कुणि सहृत्‌ कराया विहरत गात सुखांत जई

जाति छात्रगण चोहोंकडुनी जमुनि चढत वरि फिरत तई
फर्ग्युसनावसथाच्या पश्चिमभागीं टेंकडी लांब उभी
शुभ्रवसनयुत छात्रगणांसह दिसते स्वर्गगाच नभीं !
तेथिल एका शिलातलावरि बसुनि पाहतां सभोंवती
भिन्न भिन्न हृत्सागरिं बहुविध कल्पनोर्मिका उठावती
पूर्वदिशेला सन्मुख होउनि बसल्यावरि उजव्या हाता
दिसते टेकडि पाहि चहुंकडे उभवुनियां अपुला माथा
उंच तियेच्या मस्तकावरी मुगुट पर्वती शोभतसे
सिंहगडामागुनी पर्वती प्रेक्षकनयनां वेधितसे
दृष्टपूर्व वस्तु स्मरणेंही प्रत्यक्षासम स्पष्ट दिसे
टेंकडिवरुनी पर्वती मला अतांच दिसते जणुं भासे
रोज इथुनि जरि परस्परांतें बघतों तरि नच तृप्ति घडे
अशीच पर्वति पहा मजकडे मीहि पाहतों तुझ्याकडे

(३)

गतकालींचें स्मृतिचिन्ह उभें असतें जें यत्कालीन
त्या चिन्हावरुनीच होतसे त्या कालाचें अनुमान
शिवरायाचा गड-किल्ल्यांचा स्वराज्य-संस्थापन काल
त्यामागुनि मग विभव वाढलें उठूं लागले माहाल
जुने सुधारुनि नवे उभारुनि तसेच दुसरे जिंकोनी
साठतीनशें दुर्भेद्य असे केले किल्ले शिववांनीं
गडागडावरि टांकी तैशीं धान्याचींही कोठारें
भरलीं, त्यांच्या सर्वें बसविले देवांचेही देव्हारे

परी पर्वतीसमान देवालयें बगीचे त्या भोंतीं
उभवायाला विहरायाला सवड तयांला नच होती

(४)

काय दुजें तरि या व्यवहारीं वर्ततों आपण नित्याचे
कर्त्या वडिलांच्या श्रमांवरी विलास पुत्रांपौत्रांचे
प्रथमच बाबर जो संस्थापी दिल्लिस तुर्की पाच्छाई
उभवायाचें त्यास न रुचलें महाल सिंहासन कांहीं
तरुन जहालें कायम, भरलें वैभव तेव्हां पहा महान्
मयूरासनें विलासभुवनें बांधुं लागला शहाजहान्
स्वराज्यमंदिर दृढ करण्याला शिव करि किल्ल्यांची गर्दी
कार्यव्यापृत मनास कुठली उपवनभुवनांची वर्दी ?
वाढे दौलत अफाट, सवलत मिळे छत्रपति-वजिरांला
रणाजिरांला सदा भागल्या रुचूं लागल्या नजरांला —
चंद्रमुखींच्या नर्तनरीती, ज्यांस्तव उठती गिरिवरती
विहारवनिका, अपार गणिका-विलासछंदां ये भरती
निजाम-हैदर तरिही बेदरकार तयांस न दे राहूं
राही जाणिव देत तयांला—“मैं छातीपर तेरा हूं”

(५)

म्हणुनिच राही पराक्रमाचें रक्त बाहुंच्या धमन्यांत
वावरले जरि स्वैरपणें ते पर्वतिवरच्या रमण्यांत
मऊ परांच्या शय्येवरुनी तीक्ष्ण शरांची रणशय्या
प्रसंग पडला तरि भोगाया होता त्यांच्यामाजिं हिय्या

खेळाया जरि खेळ विलासी झेलाया कुलुपी गोळे
तयार करि तरि तेच तयांचे दिपवाया अरिचे डोळे
असो कसेंही निजली नव्हती जागृति स्वोन्नति-कार्याची
ज्योति कालिं त्या विझली नव्हती स्वत्वाची वा शौर्याची
पराक्रमाचा चढाव करि धनजलास उतरण पुण्याकडे
धी-श्री सोडुनि पुण्यास नयनां उघडुनि पाहि न कुणाकडे
त्या कालींचा भोजनभाऊ भोजनपात्रीं जरि बसला
पंचपात्रिचें चूर्ण कराया तयार मुष्टी जरि रुसला!
मोजाया आहार पायली, पडे जरी तो कमि शेर
भोजन भाऊ पात्रिंहि वेई सर्वेच अपुली समशेर!
घेउनियां घायांस तनुवरी साहुनियां अति सायास
मिळवी धन जो शक्त तोच कीं द्याया धर्मादायास
परंतु पुढती प्रवाह पसरे दानाच्या अभिषेकाचा
प्रवाह परि हा उगमाचि सुकवी, शेवट कटु अतिरेकाचा

( ६ )

एकीचा शौर्याचा अमुच्या मध्ययुगांतिल तो काळ
खर्ड्याच्या संग्रामानंतर कुठुनि अवलोकाल ?
कानठाळिं ज्या बसविति अरिच्या त्या दुमदुमत्या रणभेर
नाटकींहि स्वप्नीं नच दिसती रणिं चकमकत्या तरवारी !
काळ उलटला कुग्रह उठला राष्ट्राच्या राशीवरती
बाजिसम पाजी नर बसला गाजींच्या गादीवरतीं !
दानव निर्दाळुनी यशमुदें बैसुवि ऐरावतावरी

मराठी ग्रंथ



जावें वंदन कामें इंद्र वैकुंठीं कैलासपुरीं
त्यापरि समरीं विजयी होउनि बैसुनियां अंबारींत
लूट घेउनी शूर पेशवे चढती पर्वतिचा घाट
अरि-गज-निटिलां भेदुनि गुंफिलि सुढाळ मुक्ताफळ-माळा
विजयि पेशवा अर्पि तेधवां पर्वतिवरच्या देवाला

( ७ )

तें पर्वतिचें भाग्य लोपलें कालिं पळपुट्या बाजीच्या
नेपथ्यांतिल कुजबुज रुजली, कथा लोपल्या आजींच्या
ढक्कारव डंक्याचा गेला तिरकमट्याचा टंकार
उठूं लागला रुणझुण नूपुर-पैंजण-कंकण-झंकार !
शौर्याचा हो अंत, हातिंचा सुटला तोफेचा कान
पर्वतिखालीं पर्वणिकाळीं बोकाळे दानस्नान
दानरीति स्वत्वादि गुणांचा होउनियां अतिरेक अति
परक्यांचीच न स्वकीयांचिही आचरणें दुखविली मती
परस्परांचीं मनें दुखावितां आपसांत पडतां फूट
सहज मिळाली वाट परकियां शिरकविण्या अपुलें बोट !
दौलति साठीं ज्यांनिं लढावें करुनी छातीचे कोट
करणें त्यां एकत्र, 'बांधणें होइ आवळ्यांची मोट' !
एकीची भावना भंगतां फुटली स्वार्थाला उकळी
दरबारांतिल सरदारांमधिं होई सहजपणें दुफळी
दिडाकडीलहि अर्ध्याकडिलहि जाइ निघोनि शहाणपणा
जो तो मामी आपआपणा दीडशहाणा कांहिं म्हणा !

ना बंधन बेबंदशाहिमधिं एक विचारि न एकाला
भाग घ्यावया ध्ववथा-सवता सुभा-सुभा प्रत्येकाला
गोकुळिचा यदुपति ज्या अधिपति शाण्णव कुळिंचे यादव ते
धरातलींचीं राज्यें झाले इच्छामात्रें नांदवते
अंहमन्यतासवें माजतां त्यांमधिं यादवि परी पुरी
कीर्तिबलाची विभवश्रीची झालि इतिश्री खरीखुरी
नांदतांहि एकत्र होइ जैं भिन्न हिताची गुणगूग
त्याक्षणिं सकलांच्या नाशाची सूज्ञ समजती ती खूण

( ८ )

जाति निराळ्या , पंथ वेगळे, धर्म निराळे, समाजही
एक ठिकाणीं पढत दिसावे भगवद्गीता नमाजही !
सान थोर वा उच्च नीच वा मिलाफ हो जरि सकलांचा
भेद-दंड या नीतीचा मग हुकेल हिय्या सबळाचा
एक अनेकीं, अनेक एकीं होतां त्याची अमोघता
पहावया कोणासहि नलगे धुंडाळावें वेदांता
एक जातिच्या बहुत फुलांचा दिसतो सुंदर जरि गजरा
विविध फुलांचा गुच्छ मनोहार वेधित सकळांच्या नज़रा
रंगाभिन्नता गंधभिन्नता एकाचि होतां अशा परी
सौंदर्याला सौगंधाला काय उणें मग असे तरी ?
स्थूल-सूक्ष्मही श्रेष्ठ-कनिष्ठहि समान-कार्योत्पादक तें
प्रसंग येत एक दडे तरि त्याविण दुसऱ्यांचें नडतें
उच्चनीच हा भेद कशाला सहायकारी परस्परां

झाल्यावरि सहजची होतसे राष्ट्राचा उद्धार खरा
धर्मग्रंथा स्वकरीं घेउनि पवित्र इतरां न म्हणावें
शस्त्र स्वकरीं धारण करुनी दुर्बल दुजियांस गणावें!
या दोन्हीही अयोग्य रीती धर्मबंधनें कृत्रिम तीं
शौर्य-सत्व-गुण व्यक्तिसिद्ध; नच मोहति जाति-कुळावरती
राष्ट्रशरीरावयवीं करणें उचनीच ना भेद कधीं
एकाचाही रुसवा त्रासिल सकळां बिघडावोनि घडी!

( ९ )

कडेकोट बळकट बुरुजाचा एकच ढळला जरि दगड
फूट पाडुनी जूट फोडुनी छिद्र दावि अरिला उघड
होतां चंचुप्रवेश सहजचि वाव मिळे मग मुसळाला
येइ शक्ति तनु पंगु कराया पदतळिं घुसल्या मुसळाला
करोड कोटी शत्रु पुरवले एक नको परि घरभेदी
वेधी मर्मस्थळ दास्याची अडकवि पायांमधि बेडी
एकच ढळला दगड मिळवितो धुळीस सगळ्या दुर्गाला
एकच ढळला भेदी हरवी अरिकरवीं जनवर्गाला
कूपनिवासी भेककुळांतिल गंगदत्त घे अवतार
मानववंशीं स्वातंत्र्याच्या देहावरि करण्या वार
घरभेदी लोभाचें वारें जलाल भारी विषाहुनी
भरतां कानीं तो सूर्याजी पिसाळ गेला पिसाळुनी
पिसाळला गोताचा दांडा परते तो बनुनि कुठार
मराठशाहीवरचा घरचा तो झाला पहिला वार!

(१०)

हिंदभूमिविस्तीर्णोद्यानप्रांतीं अरिशिर-फलभार —
पाडित स्वेच्छामात्रें विहरत उच्छृंखळ करि संचार
परि शिरतां सैतानी वारें कानिं तयाच्या परभारीं
राघुभरारी होइ फरारी मुंबइच्या पर-दरबारीं !
देशासाठीं अबलख वारू उडवित जो अटकेपार
तोच फटकला मराठशाहीवरि झाला दुसरा वार !
स्वगृहिं परतण्या विचारितां जो वाचित पाढा नन्नाचा
केवळ तो याउपरि घातल्या बनला मालक अन्नाचा !

(११)

दुसरा बाजीराव आपुल्या अंकितांपुढें पळत सुटे !
स्वपूर्वजांच्या विमल यशावरि चढवि स्वकृतिचीं कृष्ण पुटें
होइ स्वपरिजन साज सभोंतीं तोच माजतां शिरजोर
लाज धन्याला, काज विफल हो, दिसत न मनगटिं शिरिं जोर
असला बाजीराव पळे त्या ठाव न कुठल्या गावांत
नांव घालवी, वाव पराकिया भांडण उठतां भावांत
भावाभावामधलि दावा साधित कावा परक्याचा
फडक्याचा बाहुटाहि पडला अंत होइ जरिपटक्याचा
पेशव्यांनिं पूर्वीच्या विक्रमें भूमंडळ हें हालविलें
क्रांत करुनि परप्रांत मिळवुनी शांत मनानें दान दिलें
घेउनियां घायास तनुवरी सोसुनियां अति सायास
मिळवी धन तो शक्त नच कसा द्याया धर्मदायास ?

या दुसऱ्या परि बाजीरावें मुलुख सगळा घालविला
रंग उडवुनी दंग राहतां सुयशोदीपक मालविला !
शिस्त न पूर्विल रणांगणाची दान-जपावरती भिस्त
विलास-छंदीं पडतां फंदीं स्वयेंच झाला बंदिस्त !
घालुनि खालीं मान हरवुनी भान साहुनी अपमान
प्राणरक्षणा त्राण न म्हणुनी राज्यश्रीचें करि दान
पौरुष अंगीं असतां संगीं जी बहुरंगीं कंठिं रते
तीच पुढें परि राज्यश्री-स्त्री हतवीर्याकरिंची सुटते !
कोठिल कुठला येइ अचानक याचक त्या करिसी दान
जें न मिळविलें त्या राज्याचें विपरित हें तव बलि-दान !
शरण शरण तुज म्हणतां चढला चरण झणिं तुझ्या शिरिं ज्याचा
याचक दिसला, रक्षक बदला, मालक बनला राज्याचा !
भिक्षुक यज्ञोपवितरहित त्या बघतां नच विहिताविहित
अर्पिसि बुद्धीसहित राज्यही अहिताचि अघटित हें महित !
हाय हाय ! हे बाजिराय ! तूं गायच केवळ ती तव ही—
घाय घालुनी कायेवरती धायधाय रडविली मही !
मराठशाहीवरि हा होई प्राणांतिक तिसरा वार
महाराष्ट्रलक्ष्मी तत्कालीं त्यजि प्राण होउनि ठार !

(१२)

ग्रहण रविस खग्रास लागतां शून्यकळा गगनीं अवनीं
तीच तेधवां महाराष्ट्रीच्या येई गतवैभव भुवनीं
सौभाग्याचा हिरा हिरपला ओकें उघडें कोंदण तें

वैरीयांचें हृदय हालतें बघतां मस्तक भणभणतें !
जो सर्वी महशूर भारतीं बाहि सोनियाचा धूर
भपकारा शेवटचा निघुनी वाहवि नयनांतुनि पूर !
सात समुद्रांपलीकडिल जल ध्रुवदेशजारीं शीत अति
त्याचा हबका बसे तस रसरशीत स्वर्णरसावरती !
त्या पाण्याची वाफ जहाली सोनें आटुनियां गेलें
मालक झाले हमाल,भट्टींतील कोळसे करिं आले !
सतराव्या शतकांत अवतरे महाराष्ट्रीं जी स्वतंत्रता
ती करुनी अवतारसमाप्ती जाइ देवि निजधामि अतां !
लक्ष्मीचा हा सघन पिता नित तवपदसंनिध सेवेसी—
तत्पर असुनी हिंदजननि तूं जाहलीस निर्धन कैसी ?
लक्ष्मी गेली परि लवणनिधी असुनि पसरला घरदारीं
शेतकरी बापुडा नित करी मिठावांचुनी न्याहारी !
पुष्पाविण उपवनास अथवा विधुविण वियताला विकळा
प्राणाविण देहास तशी महाराष्ट्राला येई सकळा !

(१३)

तेधवांच पर्वती !परवती सार्थनामावति झालिस तूं
आत्मवती कधिं होशिल नकळे, हृदय हळहळे केंवि कथूं ?
तो विश्राम महाल तुजवरी सतेज तैं झगमगणारा
भिंताडांच्या ढीग मातिचा भयाण आतां बघणारा !
किंवा त्या गतविभवश्रीचा देह गळाला लेश नसे
उरला तो जणुं अस्थिपंजरच भकास भासुर भासतसे !

सं.का. ५५८
म.ग्र. ७०८५
२३-३-५८



पर्वतांच्या पर्वतिवरती पार्वतीश पर्वतवासी
स्वतंत्रताप्रिय राहिल कैसा परवश ह्या पाष्यांपाशीं ?
हे शिवदेवा शिवनेरीवरि शिवरायाच्या कायेनें
महाराष्ट्र या कैलासाहुनि केलें नाहीं का येणें ?
सिंहगडावरि सिंहपराक्रम करवुनि घेसी निःसीम
अग्निकणा नयनांतुनि उडवित समरीं तळपला रणभीम
त्या तानाजीवरी वरदकर फिरला हे तव शिवदेवा !
तोच अतां कां ओढिसि मागें कृपणाचा का तो ठेवा ?
रायगडावरि अभिषेकाचा प्रवाह मंगल वाहविला
तो गड पडला अम्हां अमंगल प्रसंग कां हा पाहविला ?
मराठशाही भुवन पुण्याचें कळस चढवुनी पर्वतिचा
दिल्ली नगरी लाजवुनीयां तुवां हरविला गर्व तिचा !

(१४)

तीच पर्वती उदास चित्तीं पाहुनि आतां जीव झुरे
अग्नींतिल तेजोंश जाउनी शेष त्या स्थलीं राख उरे !
जागोजागीं उभे अझुनि हे अमित ढिगारे राखेचे
वंशीयांना स्फूर्तिद पूर्वज-पराक्रमांच्या साखेचे
फुंकर घालुनि स्फुलिंग पाडिल भस्मनिचयिं या जो आज
असला जादूगारहि पुढती सरेल साधाया काज
स्फुलिंग होतां प्रदीप्त तेजोवर्धन करण्या त्या ठायीं
संघशक्तिचें इंधन घेउनि हिंदनिवासी या भाई !
दगडादगडांतुनी निघावे अग्निगोल नाभीं तेजाचे

तेज स्वजनां दाह परजनां देतिल मणि विनवेजाचे !
अग्नितेज जलचरां अंधताकारक जें रजनीकालीं
तेंच मानवां पथदर्शक हो प्रभात नच जोंवर झाली
प्रभात झाल्याउपरी होइल उदय शुभप्रद सूर्याचा
खास खुल्या वातावरणाचा मांगल्याचा भाग्याचा

\+ × × +

एका मागुनि एक पायरी चढतां पर्वतिचा घाट
भरलें मानस हौसेनें वा जिज्ञासेनें घनदाट
पाहुन झाल्यावरी उतरतां तोच पर्वतीचा घाट
उदासीनता मनांत भरली नयनीं अश्रूंचे पाट !

\+ × × +

बिकट कार्य-कोटावरि चढवुनि स्वशरीराचा प्रिय सोल
साधतील कार्यास देऊनी पंचप्राणांचें मोल
असे युवकही निघतिल आतां गौरीकांता शिवदेवा !
हिंदभूमि तव क्रीडांगण हें तदर्थ करुनी घे सेवा

\+ × × +

भेद विसरुनी मेद झाडुनी खेद टाकुनी सर्व जणीं
स्वेदांचित एकत्र हिंदभूमातेस झटावें रात्रदिनीं

REFBK-0002858
REFBK-0002858

# मागें आणि पुढें

लेखनाच्या अनुक्रमाच्या दृष्टीनें पाहिलें तर " कवीची भेट " या काव्याचा पहिला नंबर येतो, त्या नंतर " भारत भारती " हें काव्य दुसऱ्यांदा येतें. तिसरें " राधाकृष्ण रहस्य " आणि चवथें 'सिंहगडदर्शन' व पांचवें 'पर्वती.' या शिवाय आगें मागें आरंभ करून अर्धीं अपुरीं राहिलेलीं बरींच आहेत. यांपैकीं " भारत भारती " हें काव्य दे. भ. न. चिं. केळकर यांच्या प्रस्तावनेसह व कै. वा. गुरुवर्य प्रो. गुणे आणि लोकशिक्षण कर्ते कै. ओक यांच्या अभिप्रायांसह प्रसिद्ध करावयाचें ठरवून श्री. गणेश महादजी घाटवळ यांनीं आपल्या बाल शिक्षण मालेच्या २ ऱ्या वर्षाच्या १ ल्या अंकांत ( १९१६ ) जाहीरही केलें परंतु महायुद्धाच्या दंगलींत श्री घाटवळ हे मेसापोटेमियांत गेल्यामुळें हस्तलिखित प्रत श्री. घाटवळ यांजकडेच राहिली व तें काव्य प्रसिद्ध होण्याचा योग अद्याप पर्यंत आला नाहीं. " कवीची भेट " या काव्यालाही वरील दोघां विद्वद्वर्यांचे उत्तम अभिप्राय आहेत व तें आतां लौकरच प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. यापुढें " कॉलेज हिलवरून—" या महाकाव्याचे सिंहगडदर्शन व पर्वती यांच्या पुढील ( ३ ) चतुःशृंगी व वेताळहिल आणि ( ४ ) फर्ग्युसन कॉलेज हे दोन भाग व राज्याधिरोहण—, गाईचा हंबरडा, शिवरायाची द्वारका, मेघप्रभाव इत्यादि अनेक काव्यें प्रसिद्ध व्हावयाचीं आहेत. आश्रयदात्यांच्या आधारावर व परमेश्वराच्या कृपाप्रसादावर या गोष्टी अवलंबून आहेत.

रसिकांचा नम्र

**वि. कृ. नेरूरकर.**

# प्रमोद ऑफिसमधून प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें.

**तो क्षण**—सुविचार जागृति उत्पन्न करून नीतितत्वांचे ठसे मनावर कायमचे ठसविणारी चटकदार, सामाजिक कादंबरी. किंमत १२ आणे.

**टॉलस्टॉयचें तत्वज्ञान**—ईश्वर, नीति, समाजकार्य, मनुष्याचें कर्तव्य प्रीति, भक्ति इत्यादि विषयांवरील टॉलस्टॉयचे विचार या पुस्तकांत आले आहेत. महात्मा गांधीजींना ज्याचे विचार पटले त्या सुप्रसिद्ध रशियन तत्वज्ञाचे हे विचार अप्रत्यक्षपणें गांधीजींच्या विचारसरणीवरच प्रकाश पाडणारे आहेत. या पुस्तकाचें महत्व इतक्यावरूनच कळून येईल. किंमत रफ कागद ४ आणे. ग्लेज कागद ५ आणे.

**सिंहगड दर्शन-काव्य**— प्रो. श्री. नी. चाफेकर M.A.LL.B. यांनीं प्रस्तावना लिहिलेलें व दे. भ. तात्यासाहेब केळकर आणि साहित्याचार्य तात्यासाहेब कोल्हटकर यांनीं अभिप्राय दिलेलें व सर्व नियतकालिकांनीं गौरविलेलें हें एक उत्कृष्ट काव्य आहे. किंमत फक्त ३ आणे.

**हिंदवासीयांचें प्रातःस्मरण**—आत्मोन्नति व राष्ट्रोन्नति साधूं इच्छिणाऱ्या सर्व देशभक्तांनीं हें आपल्या रोजच्या पाठांत ठेवल्यास थोर थोर राष्ट्रवीरांचें स्मरण मनास उल्लासित करील. किं. १ आणा

**चरक्यावरचें गाणें**—सूत काढतांना म्हणावयाचें हें गाणें आतां सर्वतोमुखीं होऊन बसलें आहे. प्रती फार थोड्या शिल्लक आहेत. किं. अर्धा आणा

## पुढें प्रसिद्ध होणारीं पुस्तकें

१ राज्याधिरोहण काव्य, २ कवीची भेट काव्य, ३ शिवरायाची द्वारका काव्य, ४ गाईचा हंबरडा काव्य, ५ आत्मविकास (शिक्षण—विषयक); ६ सहधर्म चारिणी (कादंबरी); ७ कांचनपूरचा कृष्ण महाल (कादंबरी) वगैरे पुस्तकें यथावकाश प्रसिद्ध होतील.

मॅ. प्रमोद, मालवण, जि. रत्नागिरी

### ...द्ध व स्वादिष्ट

## ...बिक द्राक्षासव.

सर्दी, [illegible], अजीर्ण, अपचन, मलावरोध, जीर्णज्वर, क्षयाची प्रथमावस्था, डांग्याखोक[illegible] इ.वर अप्रतिम. ह्याचे योगानें रोज शौचास साफ होतें. चुरचुरीत भूक लागते, पचनाक्रिया सुधारते, चांगली झोंप लागते व शरीर मजबूत आणि प्रकृति निरोगी राहते.

१॥ रत्तल बाटली किं. रु. १८१२; १ रत्तल किं. रु. १८६; ½ रत्तल किं. १३ आणे.

## अलेंबिक हंस छाप कोलनवॉटर.

तापांत व मस्तकशूलावर अत्यंत उपयोगी, औषधी गुण व सुगंध ह्यांमध्यें श्रेष्ठ, किंमतींत स्वस्त १८ वर्षांपासून प्रसिद्ध असून फारच खपतें.

## अलेंबिकचीं आयौंषधी प्रवाही सत्वें.

गुळवेल, कडुनिंब, कुडा, सात्विण, अश्वगंध, अनंतमूळ, बेलफळ, तुळशी, गोखरू, मंजिष्ठ, पुनर्नवा, निंबार्क, ही स्वतंत्र किंवा औषधी मिश्रणाचे कामीं वापरण्यास सोयीचीं असल्यामुळें डॉक्टर व वैद्यवर्गांमध्यें तीं फार पसंत असून मोठ्या प्रमाणावर वापरलीं जातात.

ह्या व इतर औषधांचे गुणधर्म, किंमती व विशेष माहितीसाठीं मराठी कॅटलॉग मागवा.

अलेंबिक केमिकल वर्क्स कं. लि.
प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई नं. २.

## प्रमोद ऑफिसमधून प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें.

तो क्षण—सुविच... त्विक अ... ष्ट करून नीतितत्वांचे ठसे मनावर
... ठसविणारी ... क कादंबरी. किंमत १२ आ...


मनुष्याचें

ही गोष्ट सर्वांनाच कळते. निःसत्व तांदूळ ... असतील, रुचकर अन्न पाहिजे असेल, तर **बिजवाड तांदूळ** घ्यावेत. बहुधा सर्व पेठांतून हा माल मिळतो. घाऊक प्रमाणावर मागवावयाचा झाल्यास एकदम आमच्याकडून मागवावा.

आंध्रप्रांत महात्माजींचा कट्टा अनुयायी आहे. त्या प्रांतांत दक्षिणच्या बाजूस तयार झालेल्या सुंदर खादीचें व स्वदेशी हरतऱ्हेचें कापडही आमचेकडे मिळतें. तांदुळाच्या व कापडाच्या व्यापाऱ्यांनीं व गिऱ्हाइकांनीं आम्हांला एकवार ऑर्डर देऊन अनुभव घेऊन पहावा.

**जिवाजी बाळकृष्ण सामंत**<br>
चेंदूर कांतय्या<br>
जनरल मर्चंट्स् व कमिशन एजंट्स्<br>
बेजवाडा.

तारेचा पत्ता<br>
'दाजी सामंत' बेजवाडा.<br>
Bezwada



प्रकाशक—नारायण गोविंद राजिवडेकर टोपीवाले, ३१ बुधवार पेठ, पुणें.

मुद्रक—वासुदेव गोपाळ परांजपे 'आर्यसंस्कृति' मुद्रणालय, ६ शुक्रवार, पुणें.